I o प्रत

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** बीड **P.S.(ठाणे):** परळी शहर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0088 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):** 09/04/2026 02:16

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिंनाक पासून):** 08/04/2026
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिंनाक पर्यंत):** 08/04/2026
**Time From (वेळेपासून):** 14:29 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:40 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिंनाक ):** 09/04/2026 **Time (वेळ):** 01:37 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 004

**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 09/04/2026 01:37 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पंचायत समिती कार्यालय ,परळी वै

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): समाधान बळीराम कवडे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1984

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग ,बीड ,बीड शहर,बीड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग ,बीड ,बीड शहर,बीड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9890904274

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | दशरथ देविदास गोरे | | | 1. रासंत नरहरी महाराज मंदिरा शेज,परळी जिबीड,परळी शहर, बीड,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाच रक्कम 500/ रुपये 100/ रुपये दराच्या 05 नोटा व सॅमसंग | 500.00 |

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| | | | कंपनीचा मोबाईल | |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

500.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फियाद दिंनाक 09/04/2026

मी समाधान बळीराम कवडे, वय-42 वर्षे, व्यवसाय-नौकरी, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिंबधक विभाग बीड मो.न.9890904274.

समक्ष सरकारतर्फे फिंयादी होऊन पो.स्टे.परळी शहर येथे हजर येवून फिंयाद देतो की, मी लाचलुचपत प्रतिंबधक विभाग बीड येथे दि.09/06/2025 पासून पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत आहे.
मी दि.07/04/2026 रोजी ला.प्र.वि.बीड येथे हजर असतांना श्री.सोपान चिट्टमपल्ले, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि.बीड यांनी सायंकाळी त्यांचे कक्षामध्ये बोलावून कळविले की, मुळ तक्रारदार श्री.यशंवत सोनवणे यांची एका लोकसेवका विरुध्द तक्रार असल्याचे सांगुन दि.08/04/2026 रोजी परळी वै.जि.बीड येथे जावुन तक्रारदार श्री.सोनवणे यांची सविस्तर तक्रार घेवून पुढील कारवाई करण्यासाठी आदेशीत केल्याने मी दि.08/04/2026 रोजी विभाग नियंत्रक, राज्य परिवहन, बीड यांचेकडुन दोन पंच कर्मचारी उपलब्ध करुन घेवुन स्टाफ व पंचासह शासकीय वाहनाने कृषी महाविद्यालय, परळी वै. जि.बीड येथे सुरक्षीत ठिकाणी पोहचलोत. त्यानतर काही वेळाने तक्रारदार श्री.सोनवणे हे सुरक्षीत ठिकाणी हजर आले. तेथे त्यांनी त्यांची तक्रार त्यांचे स्वहस्ताक्षरात लिहुन दिली की, " मौजे पिंपळगाव (गाडे) येथे गट क्रमांक 581 मध्ये माझ्या नावावर 84 आर. इतकी शेत जमीन आहे. सन 2023-2024 मध्ये माझ्या नावावर महात्मा गांधी रोजगार हमी योजने अंतर्गत सदर जमीनी मध्ये सिंचन विहीर मंजुर झाली असुन विहीरीचे खोदकाम व बांधकाम हे सन 2025 मध्ये पुर्ण केलेले आहे. विहीरीचे खोदकामाचे पैसे मला मिळालेले असुन बांधकामाचे (कुशल) पैसे मिळालेले नाहीत. सदर विहीरीचे बांधकामाचे (कुशल) बिल मिळण्यासाठी मी दि.06/04/2026 रोजी आमचे गावचे रोजगार सेवक श्री.राडकर यांचेकडे गेलो असता, त्यांनी मला म्हणाले की, सदर बिलावर ग्रामपंचायत अधिकरी श्री.गोरे साहेब यांची सही घेवून फाईल माझ्याकडे आणुन द्या असे सांगीतले. त्यावरुन मी त्याच दिवशी ग्रामपंचायत अधिकरी श्री.गोरे साहेब यांची पंचायत समिती कार्यालय परळी वै. जि.बीड येथे भेट घेवून माझे विहीरीचे बांधकाम पुर्ण झालेले असुन बांधकामाचे (कुशल) बिलावर सही पाहिजे असे सांगीतले. त्यावर श्री.गोरे साहेब यांनी मला 1000/- रुपये दिल्याशिवाय बिलावर सही करणार नाही असे म्हणुन फाईल मधील काही पानावर सही करुन उर्वरित दोन पानावर पैसे दिल्याशिवाय सही करणार नाही, उद्या पैसे घेवून या आणि सही घेवून जा असे सांगीतले." वगैरे मजकुराची तक्रार दिल्याने त्याची तक्रार पंचासमक्ष घेवुन तक्रार व कागदपत्रावर आम्ही, पंच, तक्रारदार यांनी सहया केल्या.
तक्रारदार श्री.सोनवणे यांचे तक्रारीचे अनुषंगाने दि.08/04/2026 रोजी आम्ही लोकसेवक श्री.गोरे, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत जिरेवाडी व अतिरिक्त कार्यभार ग्रामपंचायत पिंपळगाव (गाडे) हे तक्रारदार यांचेकडे महात्मा गांधी रोजगार हमी योजने अंतर्गत सिंचन विहीरीचे बांधकामाचे (कुशल) बिलावर सही करण्यासाठी लाचेची मागणी करतात किंवा कसे ? याबाबत तक्रारदार व पंच क्र.1 श्री.मुंडे यांना लोकसेवक श्री.गोरे यांचेकडे त्यांचे खाजगी कार्यालयात पाठवुन लाचमागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंचांना लाचमागणी पडताळणीचे अनुषंगाने योग्य त्या सुचना देऊन व्हाईस रेकॉर्डर बाबत सविस्तर माहिती देण्यात आली. त्यानंतर आमचे सुचनेवरून पोह/शेळके यांनी व्हाईस रेकॉर्डर तक्रारदार यांचे बनियानचे डावे बाजुस छाती लगत सुरक्षीत बांधुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन तक्रारदार व पंच क्र.1 श्री.मुंडे यांना लोकसेवक श्री.गोरे यांची भेट घेण्यासाठी त्यांचे खाजगी कार्यालय, विद्यानगर परळी वै. येथे 14.19 वा. तक्रारदार यांचे कडील मोटारसायकलने

रवाना केले. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र.1 श्री.मुंडे हे त्यांचेकडील मोटार सायकलने 14.27 वा. कृषी महाविद्यालय परळी येथे सुरक्षीत ठिकाणी परत आले. त्यानंतर आमचे सुचनेवरून पोह/शेळके यांनी व्हाईस रेकॉर्डर बंद करून ताब्यात घेतला. त्यावेळी पंच क्र.1 श्री.मुंडे व तक्रारदार यांना लोकसेवक श्री.गोरे यांचे भेटी बाबत विचारणा केली असता, पंच क्र.1 श्री.मुंडे व तक्रारदार यांनी श्री.गोरे यांचे खाजगी कार्यालय बंद असल्याचे सांगीतले. त्यानंतर तक्रारदार श्री.सोनवणे यांनी लोकसेवक श्री.गोरे हे त्यांचे कार्यालयात येणार आहेत का याबाबत त्यांना फोन करुन विचारणे बाबत विंनती केल्याने आम्ही सदरचा कॉल व्हाईस रेकॉर्ड मध्ये रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगुन पोह/शेळके यांना व्हाईस रेकॉर्ड चालु करण्यास सांगुन तक्रारदार यांना लोकसेवक श्री.गोरे यांना फोन करुन मोबाईल फोनचा स्पिकर ऑन करुन बोलण्यास सांगीतले. त्यावर तक्रारदार यांनी लोकसेवक श्री.गोरे यांचे मोबाईलवर कॉल केला असता, पंचायत समितीला आलो आहे, पंचायत समितीला या असे सांगीतले. त्यानंतर लागलीच तक्रारदार यांचेकडे महात्मा गांधी रोजगार हमी योजने अंतर्गत सिंचन विहीरीचे बांधकामाचे (कुशल) बिलावर सही करण्यासाठी लाचेची मागणी करतात किंवा कसे ? याबाबत तक्रारदार व पंच क्र.1 श्री.मुंडे यांना लोकसेवक श्री.गोरे यांचेकडे त्यांचे पंचायत समिती कार्यालय परळी वै. येथे पाठवुन लाचमागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर आमचे सुचनेवरून पोह/शेळके यांनी व्हाईस रेकॉर्डर तक्रारदार यांचे बनियानचे डावे बाजुस छाती लगत सुरक्षीत बांधुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन तक्रारदार व पंच क्र.1 श्री.मुंडे यांना लोकसेवक श्री.गोरे यांची भेट घेण्यासाठी पंचायत समिती कार्यालय परळी वै. येथे 14.29 वा. तक्रारदार यांचे कडील मोटारसायकलने रवाना केले. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र.1 श्री.मुंडे हे त्यांचेकडील मोटार सायकलने 14.40 वा. कृषी महाविद्यालय परळी येथे सुरक्षीत ठिकाणी परत आले. त्यानंतर आमचे सुचनेवरून पोह/शेळके यांनी व्हाईस रेकॉर्डर बंद करून ताब्यात घेतला. त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंच क्र. 1 श्री.मुंडे यांना स्वतंत्र विचारपुस करून व्हाईस रेकॉर्डमध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकले असता, तक्रारदार व पंच क्र.1 श्री.मुंडे असे लोकसेवक श्री.गोरे यांचे पंचायत समिती कार्यालय परळी वै. येथे गेले असता तक्रारदार व लोकसेवक श्री.गोरे यांची भेट झाली. भेटी दरम्यान कामासंदर्भाने चर्चा झाली. चर्चे दरम्यान तक्रारदार यांनी लोकसेवक श्री.गोरे यांना " एक वर्ष व्हायलं साहेब या फाईलीला " असे म्हणाले त्यावेळी लोकसेवक श्री.गोरे हे माझ्यापाशी आता फाईल आली, मी काय करु त्याला, माझ्यामुळ कुठं अडलय का असे म्हणाले. त्यावेळी लोकसेवक श्री.गोरे यांनी तक्रारदार यांची फाईल पाहत किती चुकतयं भैया..असे म्हणत तक्रारदार यांचे फाईलची पाहणी करत " हं..घ्या पैसे घ्या " असे तक्रारदारास म्हणाले असता तक्रारदार यांनी " किती द्यायचे " असे विचारले. त्यावेळी लोकसेवक श्री.गोरे यांनी "हजार रुपये द्यायचे " असे म्हणुन 1000/- रुपये लाचेची मागणी केली. त्यावेळी तक्रारदार यांनी हजार असतेत काय ओ..पाचशे घ्या असे म्हणाले. त्यावर लोकसेवक श्री.गोरे "नाही..हजार रुपये द्याचे असले तर द्या, नाहीतर राहुद्या सगळेच तुम्हाला.. एवढं काय त्याला..पाचशे घेवून काय करायचे, द्या..द्या पैसे दया " असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार देतो ना उद्याच्याला असे म्हणाले. त्यावेळी लोकसेवक श्री.गोरे यांनी " नाही..आता द्या चला, पाचशे तर द्या " असे म्हणुन तडजोडअंती 500/- रुपयाची मागणी केली. त्यावर तक्रारदार यांनी ऑफिसला येवू असे विचारले असता, लोकसेवक श्री.गोरे यांनी कुठेबी या पण पैसे घेवून या असे म्हणुन लागलीच 500/- रुपये लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. लाचमागणी पडताळणी वरुन लोकसेवक श्री.गोरे यांचे विरुध्द त्यांचे खाजगी कार्यालयात परळी वै.जि.बीड येथे लाचेच्या सापळ्याचे आयोजन करण्यात येणार असल्याचे तक्रारदार यांना सांगितले त्यावरुन कृषी महाविद्यालय, परळी वै. येथे सुरक्षीत ठिकाणी शासकिय वाहनामध्ये पंचासमक्ष आम्ही तक्रारदार व दोन्ही पंचांना अँथ्रासीन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्प यांचा उपयोग व गुणधर्म सांगुन कृत्रीम अंधारात त्याचे प्रात्यक्षीक करुन दाखवुन तक्रारदार यांनी हजर केलेल्या ज्यामध्ये 100/-रु दराच्या 05 नोटा असे एकुण 500/- रुपये लाच रककमेस अँथ्रासीन पावडर लावली व सदरची लाच रक्कम ही तक्रारदार यांचे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशात ठेवली. तक्रारदार यांना लाच स्वीकृती नंतर करावयाचा ईशारा " डोक्यास बांधलेला गमज्या काढुन डाव्या हातामध्ये घेण्याचा " इशारा नेमुन दिला व वेळे अभावी लागलीच सापळा कारवाईचे आयोजन करुन लाचमागणी पडताळणी, सापळापुर्व व यशस्वी सापळा कारवाईचा पंचनामा सापळा कारवाई झाल्यानंतर एकत्रीत करण्यात येणार असल्याचे आम्ही पंच व तक्रारदारास सांगीतले.

सापळा पुर्व कारवाई पुर्ण झाल्यानंतर आम्ही तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकास सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना दिल्या. त्यानंतर आमचे सुचनेवरुन पोह/शेळके यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन तक्रारदार यांचे बनियानचे डावे बाजुस व्हाईस रेकॉर्डर सुरक्षीत बांधुन ते चालु करुन तक्रारदार व पंच क्र.1 श्री.मुंडे यांना लोकसेवक श्री.गोरे यांची भेट घेवुन लाच रक्कम देण्यासाठी त्यांचे खाजगी कार्यालयात परळी वै.जि.बीड येथे 15.16 वा. रवाना केले. त्यांचे पाठोपाठ आम्ही, पंच क्र.2 श्री.बारस्कर व सापळा पथक शासकीय वाहनाने रवाना झालो. तक्रारदार व पंच क्र.1 श्री.मुंडे असे श्री.गोरे यांचे विद्यानगर, परळी वै.जि.बीड येथील खाजगी कार्यालयात जाताना दिसले. आम्ही

त्यांचे खाजगी कार्यालयाचे परिसरात सापळा लावुन तक्रारदार यांचे इशाऱ्याची वाट पाहत थांबलो. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार हे खाजगी कार्यालयाचे दर्शनी भागामध्ये येवून त्यांना नेमुन दिलेला इशारा केला.
त्यानंतर माझे सुचनेवरून सापळा पथक तात्काळ सक्रिय होवून पंच क्र.02 श्री.बारस्कर यांचे सह त्यांचे खाजगी कार्यालयात हजर आलोत. माझे सुचनेवरून पोह/शेळके यांनी तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवून बंद केला. त्यानंतर मी पंच क्र.01 श्री.मुंडे यांना लाचेची रक्कम कोणी मागीतली व कोणी स्विकारली असे विचारले असता पंच क्र.01 श्री.मुंडे यांनी तेथे हजर असलेल्या एका इसमाकडे अंगुली निर्देश करुन हेच ते लोकसेवक श्री.गोरे असुन त्यांनी तक्रारदार श्री.सोनवणे यांचेकडुन उजवे हाताने लाच रक्कम स्विकारुन त्यांनी अंगावर परिधान केलेल्या शर्टच्या डाव्या बाजुच्या समोरील खिशामध्ये ठेवली असे सांगीतले. त्यावेळी आम्ही लोकसेवक श्री.गोरे यांना माझी, दोन्ही पंचाची व सापळा पथकाची ओळख करून दिली. त्यानंतर लोकसेवक श्री.गोरे यांना त्यांचे नाव, गाव व पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव दशरथ देविदास गोरे, वय-48 वर्ष, व्यवसाय-नौकरी, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत जिरेवाडी अतिरिक्त कार्यभार ग्रामपंचायत पिंपळगाव (गाडे) ता.परळी जि.बीड रा.संत नरहरी महाराज मंदिरा शेजारी, द्रोणाचार्य शाळेजवळ, परळी जि.बीड (वर्ग-3) असे सांगितले. त्यानंतर आम्ही लोकसेवक श्री.गोरे यांना लाच रक्कमेबाबत विचारणा केली असता त्यांनी लाच रक्कम अंगावर परिधान केलेल्या शर्टचे डावे बाजुचे समोरील खिशात असल्याचे सांगीतले. त्यानंतर आम्ही पंच क्र.2 श्री.बारस्कर यांना लोकसेवक श्री.गोरे यांनी परिधान केलेल्या शर्टचे डावे बाजुचे समोरील खिशातुन लाच रक्कम बाहेर काढुन ताब्यात घेऊन खात्री करण्यास सांगीतले. त्यावरुन पंच क्र.2 श्री.बारस्कर यांनी लाचरक्कम ताब्यात घेतली व पंच क्र.1 श्री.मुंडे यांनी लाचेच्या नोटांचे वर्णन व क्रमांक नमुद असलेला कागदावरील नोटांचे क्रमांक पंच क्र.2 श्री.बारस्कर यांना वाचुन दाखवले असता पंच क्र.2 श्री.बारस्कर यांनी लाचेच्या नोटांची खात्री करुन सापळापुर्व कारवाई दरम्यान नमुद केलेल्या नोटांशी तंतोतंत मिळुन आल्याचे सांगीतले. त्यानंतर आम्ही लाच रक्कम 500/- रुपये पंच क्र.2 श्री.बारस्कर यांना पुढील सुचनेपर्यंत ताब्यात ठेवण्यास सांगीतले. त्यानंतर आम्ही लोकसेवक श्री.गोरे यांना तक्रारदार श्री.सोनवणे यांचे कामासंदर्भातील कागदपत्रा बाबत विचारणा केली असता, लोकसेवक श्री.गोरे यांनी कागदपत्रांची फाईल त्यांचे टेबलवर असल्याचे दर्शविल्याने पंचासमक्ष ताब्यात घेतली. त्यानंतर आम्ही सापळा कारवाई दरम्यान व्हाईस रेकॉर्डर मधील संभाषण ऐकले असता, तक्रारदार यांनी फाईलवर सही व शिक्का मारण्यास सांगीतला असता, लोकसेवक श्री.गोरे हे " द्या पैसे द्या " असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार यांनी पाचशे रुपये काढुन लोकसेवक श्री.गोरे यांचे समोर धरले असता, लोकसेवक श्री.गोरे यांनी पाचशे रुपये स्विकारुन आणखी पाचशे रुपये दया असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार यांनी "आहो मगा पाचशे म्हणालात ना" असे म्हणाले. त्यावेळी परत लोकसेवक श्री.गोरे यांनी पाचशे रुपयांची मागणी केली. त्यावेळी तक्रारदार यांनी दुसऱ्या वेळेस देतो असे सांगीतले. त्यानंतर तक्रारदार यांचे कामासंदर्भात चर्चा झाली. त्यादरम्यान लोकसेवक श्री.गोरे यांनी " कालच तुम्ही पैसे फेकायचेना माझ्या तोंडावर हजार रुपये " असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी पैसे नव्हते आमचेकडे असे सांगीतले. त्यानंतर लोकसेवक श्री.गोरे यांनी तक्रारदार यांचे फाईलवर शिक्के मारले. त्यानंतर लोकसेवक श्री.गोरे यांना लाच रक्कमेसह रंगेहात पकडण्यात आले.
त्यानंतर आम्ही घटनास्थळा वरील प्राथमिक कारवाई लोकसेवक श्री.गोरे यांचे खाजगी कार्यालयात पुर्ण करुन पुढील कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड येथे करण्यात येणार असल्याचे तक्रारदार, पंच व सापळा पथकास सांगीतले. त्यानंतर आम्ही, सापळा पथकातील सदस्य, दोन्ही पंच, तक्रारदार श्री.सोनवणे व लोकसेवक श्री.गोरे असे शासकीय वाहनाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड येथे हजर आलोत. तसा एकत्रीत लाचमागणी पडताळणी, सापळापुर्व व यशस्वी सापळा कारवाईचा पंचनामा लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड येथे केला आहे.
तरी दिनांक 08/04/2026 रोजी 14.29 वा. ते 14.40 वा. सुमारास पंचायत समिती कार्यालय परळी वै. जि. बीड येथे यातील मुळ तक्रारदार श्री.यशवंत पांडुरंग सोनवणे, वय-54 वर्ष, व्यवसाय-शेती, रा.पिंपळगाव (गाडे), ता. परळी वै. जि.बीड यांचेकडे महात्मा गांधी रोजगार हमी योजने अंतर्गत सिंचन विहीरीचे बांधकामाचे (कुशल) बिलावर सही करण्यासाठी लोकसेवक श्री.दशरथ देविदास गोरे, वय-48 वर्ष, व्यवसाय-नौकरी, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत जिरेवाडी अतिरिक्त कार्यभार ग्रामपंचायत पिंपळगाव (गाडे) ता.परळी जि.बीड (वर्ग-3) यांनी 1000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडअंती 500/- रुपये लागलीच स्विकारण्याचे मान्य करुन दिनांक 08/04/2026 रोजी 15.22 वा. लोकसेवक श्री.गोरे यांचे खाजगी कार्यालयात लाचरक्कम 500/- रुपये स्विकारले असता लोकसेवक श्री.गोरे यांना लाचेच्या रक्कमेसह पकडले म्हणुन माझी लोकसेवक श्री.दशरथ देविदास गोरे, वय-48 वर्ष, व्यवसाय-नौकरी, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत जिरेवाडी अतिरिक्त कार्यभार ग्रामपंचायत पिंपळगाव (गाडे) ता.परळी जि.बीड रा.संत नरहरी महाराज मंदिरा शेजारी, द्रोणाचार्य शाळेजवळ, परळी जि.बीड (वर्ग-3) यांचेविरुध्द कलम 7 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 प्रमाणे फिर्याद आहे.
माझी वरील फिर्याद ही माझे सांगणे प्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली असुन ती बरोबर व खरी आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Raghunath Kaduba Nachan(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
PSI (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Raghunath Kaduba I
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PI

पोलीस ठाणे अंमलदार
पो.स्टे.परळी शहर

(दिपक देविदास राठोड)
पोउपनि. पो.स्टे.परळी शहर.